(१)

जा.क्र.२००५/पुनर्वसन/कक्ष-१/सि.आर.६१
विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद
दिनांक :- 03 /१०/२००५

**महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तीचे पुनर्वसन अधिनियम १९९९ अन्वये कलम ११ (१) ची**

**अधिसूचना**

(१) क्रमांक २००५/पुनर्वसन/कक्ष-१/सिआर-६१ महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९ च्या कलम ११ च्या पोटकलम (१) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन, विभागीय आयुक्त औरंगाबाद विभाग औरंगाबाद या द्वारे लातूर जिल्हयाच्या रेणापूर तालुक्यातील पाथरवाडी साठवण तलाव यास उक्त अधिनियमाच्या कलम (१) खंड (अ) व खंड (ब) च्या तरतुदींच्या अनुरोधाने उक्त अधिनियमाच्या तरतुदी लागू होतील. त्या प्रकल्पाच्या संबंधात या द्वारे--

(अ) उक्त प्रकल्पाच्या बाधीत किंवा लाभधारक परीमंडळामध्ये येण्याची शक्यता आहे अशी गांवे खालील प्रमाणे विनिर्दीष्ट करीत आहे --

(एक) बाधित परिमंडळात येण्याचा संभव असणारी गांवे --

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुक्याचे नांव | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | पाथरवाडी (शेतजमीन) | रेणापूर | लातूर |
| २ | माणूसमारवाडी (शेतजमीन) | रेणापूर | लातूर |
| ३ | पानगांव (शेतजमीन) | रेणापूर | लातूर |

(दोन) लाभधारक परिमंडळात येण्याचा संभव असलेली गांवे --

| अ.क्र. | गावाचे नांव | तालुक्याचे नांव | जिल्हयाचे नांव |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| १ | पाथरवाडी | रेणापूर | लातूर |
| २ | माणूसमारवाडी | रेणापूर | लातूर |
| ३ | पानगांव | रेणापूर | लातूर |

(११)

(ब) वरील परिच्छेद "अ" मधील (एक) आणि (दोन) मध्ये नमूद केलेल्या गांवातील एखाद्या व्यक्तीच्या संपूर्ण धारण क्षेत्राला किंवा त्यांच्या भागाला लागू असल्याप्रमाणे उक्त अधिनियमाच्या कलम १२ मध्ये विनिर्दिष्ट केलेले निर्बंध अशा गावातील किंवा क्षेत्रातील निर्देशीत धारण क्षेत्राला तात्पुरते लागू होतील. मात्र संबंधीत परिमंडळातील त्यांच्या एकूण धारण जमीनीचे क्षेत्र ३.२३ हे.आर. पेक्षा कमी असता कामा नये.

(२) विभागीय आयुक्त असाही निर्देश देत आहे की, ही अधिसूचना संबंधीत गावामध्ये दवंडी पिटवून बाधित किंवा लाभ मिळालेल्या परिमंडळातील एखाद्या किंवा अनेक ठळक जागी गावांच्या चावडीवर आणि कोणतेही ग्रामपंचायत असल्यास ग्रामपंचायतीच्या कार्यालयात तसेच जिल्हाधिकारी, तहसीलदार, प्रकल्प अधिकारी व आयुक्त कार्यालयात देखील ठळक जागेवर किंवा जागांवर या अधिसूचनेची प्रत चिकटवून लातूर जिल्हाधिका-यांकडून सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल किंवा करण्याची व्यवस्था करण्यात येईल.

(कृ.भि.भोगे)
विभागीय आयुक्त,
औरंगाबाद.